सामान्य माणसाचा उंचावलेला स्वर

चतुरस्र परखड रास्त कर्तव्यदक्ष

# चपराक

पुणे

मूल्य ३₹

संपादक : घनश्याम पाटील

www.chaprak.com

वर्ष : ६ अंक : ०५ पाने : ४

सोमवार, दि. १५ ते २१ फेब्रुवारी २०१६ RNI No. MAHMAR/2011/35979 पोस्टल नोंदणी क्र. : PCW/159/2014-2016

Licensed to post without prepayment of postage no. WPP - 14 Posted at Pune PSO on every wednesday, date of publication 15/02/2016

KaMani masale



किंग ऑफ टेस्ट

व्हेज-नॉनव्हेजचे स्वादिष्ट मसाले

संपर्क : डी. एम. कामंत फूड प्रॉडक्टस् प्रा. लि.

तिरूमला इंडस्ट्रियल इस्टेट, प्लॉट नं. ४,

टाटा जॉन्सन कंपनीसमोर, हिंजवडी, पुणे ४११ ०५७

दूरध्वनी ०२०-६५२९२४००

Email : dkamant@rediffmail.com Web. : www.kamantmasale.com

# प्रा. मिलिंद जोशी यांची परिषदेला आवश्यकता

**महाराष्ट्र साहित्य परिषदेचे साहित्यविषयक धोरण कसे असावे याबद्दल परिषदेचे अध्यक्ष डॉ. प्र. चिं. शेजवलकर यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेत केलेले हे विवेचन. सुरू असलेली निवडणूक प्रक्रिया संपताच परिषदेची नवी कार्यकारिणी अस्तित्वात येईल. आजीव सभासदांच्या आग्रहास्तव प्राचार्य शेजवलकर यांचे वार्षिक सर्वसाधारण सभेतील हे भाषण खास 'चपराक'च्या वाचकांसाठी.**

---

**महाराष्ट्र साहित्य परिषदेचे आदरणीय विश्वस्त आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेवर नितांत प्रेम करणारे माननीय सदस्य मित्रहो!**

***माझा*** अध्यक्षीय पदाचा कार्यकाल सुमारे सहा महिन्यांनी संपणार असल्यामुळे आणि त्याआधीची होणारी वार्षिक सभा माझ्या कार्यकाळात शेवटची असल्यामुळे मनात केलेले प्रकट चिंतन आपल्यापुढे सादर करीत आहे. हे करताना कोणत्याही व्यक्तीवर टीका करणे माझ्या स्वभावाला धरून नाही. आज मी महाराष्ट्र साहित्य परिषदेचा अध्यक्ष म्हणून तुमच्या समोर निवेदन करताना मला अतिशय दुःख होत आहे. माझ्या मनात कोणाबद्दल राग नाही. मात्र गेल्या काही दिवसात अनेक सदस्य मला भेटले आणि काहींनी मला पत्रेही पाठवली आणि त्यांच्याकडून कार्याध्यक्षांच्या कार्यपद्धतीवर अनेकांनी नाराजी व्यक्त केली. कार्याध्यक्ष डॉ. माधवी वैद्य यांचा गेल्या चार वर्षातला, त्यांनी केलेला कारभार पाहता त्यांच्यामुळे म.सा.प.ची प्रचंड बदनामी झाली आहे आणि परिषदेच्या सत्कीर्तीस प्रचंड हानी पोहोचली आहे. त्यांचा महामंडळाच्या अध्यक्ष म्हणून असलेला कारभार सुद्धा अत्यंत आक्रस्ताळेपणाचा आणि हटवादी आहे असे माझ्या कानावर आलेले आहे. घुमान आणि अंदमान येथे झालेल्या साहित्य संमेलनात जे गैरप्रकार झाले त्यालाही महामंडळाच्या अध्यक्षा याच जबाबदार आहेत असे मला वाटते.

गेल्या चार वर्षातला माझा अध्यक्ष म्हणून मला आलेला अनुभव हा देखील अतिशय क्लेषदायक आहे. ''आपल्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सध्याच्या घटनेप्रमाणे अध्यक्ष ही फक्त मानाची जागा असून अंतर्गत धोरणे आणि व्यवस्थापन इतर पदाधिकाऱ्यांच्या हातात आहेत'' असे मला माझी अध्यक्षपदी नियुक्ती झाल्यावर कार्याध्यक्षांनी लगेचच सांगितले. खरे म्हणजे त्यांचे सांगणे योग्य नव्हते. हे मलाही आणि इतरांनाही पटलेले नाही. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कारभाराबद्दल लक्ष घालणे हे अध्यक्षांच्या अधिकारात असते. जेव्हा जेव्हा अनेक सदस्यांकडून कार्याध्यक्षांबद्दल प्रचंड नाराजी असलेल्या तक्रारी माझ्याकडे येऊ लागल्या तेव्हा आपण स्वतः त्यात लक्ष घालावे असे मला वाटू लागले. माझ्या आधीचे अध्यक्ष प्रा. द. मा. मिरासदार यांनी एकच वर्षानंतर अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. विद्यमान कार्याध्यक्ष ज्या पद्धतीने वागत आहेत त्यामुळे अतिशय उबग येऊन मी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला, असे मला मिरासदार यांनी स्पष्टपणे सांगितले होते. मी फारसे लक्ष न घातल्यामुळे कार्याध्यक्षांनी मनमानी कारभार सुरू केला. त्यांच्या वागण्यात आणि बोलण्यात मलाही उद्दामपणा आणि अहंकार जाणवला. त्यातच त्यांनी जे गैरप्रकार केले त्याबद्दल काही सदस्य जे बोलले त्यांच्याशी मी पूर्णपणे सहमत आहे. महामंडळाच्या अध्यक्षा म्हणून त्यांनी केलेला कारभारसुद्धा अतिशय चुकीचा आणि धक्कादायक होता. सासवड आणि घुमान येथे झालेल्या साहित्य संमेलनाच्या वेळी त्यांनी छोटीशी संहिता लिहिल्याबद्दल भरपूर मानधन घेतले, असे माझ्या कानावर आले आणि माझ्या मते ही त्यांनी केलेली अक्षम्य अशी चूक होती. चॅरिटी कमिशनर यांच्याकडून त्यांना चारवेळा नोटीस येऊन देखील त्यांनी कागदपत्रे दिली नाहीत. त्यामुळे त्यांना चॅरिटी कमिशनरने पाच हजार रूपयांचा दंड केला. त्यांनी आणि सुनील महाजन यांनी चेकवर सह्या करून रोख पैसे काढले आणि ते संस्थेतर्फे भरले हे कितपत योग्य आहे ते तुम्हीच ठरवावे. कोषाध्यक्ष सुनील महाजन यांनीही दोन्ही संमेलनाच्या



डॉ. प्र. चिं. शेजवलकर

**''माझ्या कार्यकाळात प्राध्यापक मिलिंद जोशी यांचा प्रमुख कार्यवाह पदाचा राजीनामा ही एक दुर्दैवी घटना घडली याचे मला फार वाईट वाटले. मिलिंद जोशी हे प्रसिद्ध साहित्यिक, उत्तम वक्ते आणि प्रशासकीय जाण असलेले प्राध्यापक आहेत. त्यांचा सहभाग परिषदेला उपयोगी पडला असता. त्यांनी पुढील निवडणुकीनंतर साहित्य परिषदेत पुन्हा पदार्पण करावे असे मला मनापासून वाटते.''**

**प्राचार्य डॉ. प्र. चिं. शेजवलकर**
**दूरध्वनी : ०२०-२५४३५५९६**

वेळी त्यांनी सादर केलेल्या मनोरंजनाच्या कार्यक्रमाचे भरपूर पैसे घेतले असे मला सांगण्यात आले. या संबंधीचे पत्रही माझ्याकडे आले आहे. पदाधिकाऱ्यांनी लाभार्थी होणे योग्य नाही. कार्याध्यक्षांनी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या पाच उमेदवारांपैकी डॉ. श्रीपाल सबनीस या एका उमेदवारासाठी जाहीर प्रशस्ती दिली हेसुद्धा योग्य झाले नाही. शरणकुमार लिंबाळे अध्यक्षीय उमेदवारीकरता फॉर्म भरावयास आले तेव्हा 'तुमचे नाव यादीतच नाही' असे कार्याध्यक्ष म्हणाल्या. त्यांनी जेव्हा पैसे भरल्याची पावती दाखवली तेव्हा कार्याध्यक्षांनी चूक मान्य केली. अनेकांनी माझ्याकडे अशाच प्रकारच्या तक्रारी केल्या. माननीय सदस्यांची अपेक्षा मात्र अध्यक्षांनी क्रियाशील रहावे असे वाटल्यामुळे ते मला अनेक प्रकारच्या सूचना करीत असतात. त्या जशाच्या तशा अमलात आणणे माझ्या हातात नसते. महामंडळावरसुद्धा आमच्यापैकी कोणी जावे या संबंधीची धोरणे आणि व्यवस्थापन इतर पदाधिकाऱ्यांच्या हातात आहेत असे मला माझी अध्यक्षपदी नियुक्ती झाल्यावर लगेचच सांगण्यात आले होते. त्यामुळे महामंडळाच्या कार्यात अध्यक्षांना, म्हणजे मला, सहभागी होता आले नाही. महामंडळाचे स्वतंत्र अस्तित्व आवश्यक आहे का? याबाबत अनेक सदस्यांनी आपली मते व्यक्त केली आहेत. महामंडळाच्याऐवजी त्या त्या घटक संस्थेतील सर्व पदाधिकाऱ्यांनी कामकाज बघावे असे अनेक सदस्यांना वाटते आणि त्यात कार्यकारिणीच्या तीन सदस्यांनी आणि त्याचबरोबर ज्येष्ठ साहित्यिकांपैकी दोन साहित्यिकांना स्वीकृत करून व्यापक स्थानिक समिती स्थापन करावी आणि या समितीने साहित्य संमेलने आयोजित करावीत असे अनेकांना वाटते. सध्या ज्या पद्धतीने पदाधिकारी निवडले जातात त्यामध्ये कार्याध्यक्ष, प्रमुख कार्यवाह आणि कोषाध्यक्ष यांची निवड थेट सदस्य करतात. अध्यक्षांची निवड मात्र कार्यकारिणी तर्फे केली जाते. त्यामुळे अध्यक्ष म्हणजे एक 'अडगळ' आहे असेच कार्याध्यक्षांना वाटत आले असावे. कधी कधी तर अध्यक्ष म्हणजे 'असून अडचण आणि नसून खोळंबा' असे वाटण्याइतपत आपण तेथे आहोत अशी भावना माझ्या मनात निर्माण झाली. कारण गेल्या चार वर्षात कार्याध्यक्ष आणि कोषाध्यक्ष काय व्यवहार करतात ते मला कधीही सांगण्यात आले नाही. मी शक्यतोवर परिषदेत येऊच नये असेच कार्याध्यक्षांच्या मनात असावे. परिषदेतील जाहीर कार्यक्रमांना देखील कार्याध्यक्षाच अध्यक्ष म्हणून बसत. डॉ. सदानंद मोरे यांच्या सत्काराच्या वेळी मी आपणहून गेलो होतो तेवढेच. माझी अध्यक्षपदी नियुक्ती झाली तेव्हा आपण स्वतः कोणकोणत्या गोष्टी करावयात या संबधी मी काही योजना मनात मांडल्या होत्या. मात्र त्या मला अमलात आणता आल्या नाहीत. उदा. पूर्व प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक अशा मराठी शाळांची अवस्था केविलवाणी झाली आहे आणि त्यामध्ये शासनाने सुधारणा करावी म्हणून साहित्य परिषदेने जोरात प्रयत्न करावा असे मला नेहमी वाटत आले आहे. मराठी ही ज्ञानभाषा व्हावी या दृष्टीने प्रकाशकांनी ललित वाङ्मयाखेरीज इतर विद्याशाखातील विषयांची पुस्तके मराठीत प्रसिद्ध करावीत असे माझे मत आहे. महाविद्यालयीन तरूणांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेकडे आकर्षित व्हावे यासाठी त्यांच्याकरता परिषदेने विशेष कार्यक्रम आयोजित करावेत म्हणजे नव्या पिढीचा मराठी साहित्य वाचण्याकडे ओढा राहील. अन्यथा आजच्या तरूण मुलांचे, सोशल मीडियामध्ये आणि मोबाईलचा वापर खूप वाढल्यामुळे, मराठी वाचन एकदम कमी झाले आहे. ज्या दिवशी तरूणांची हॉटेलकडे जाणारी पाऊले ग्रंथालयाकडे वळतील त्या दिवशी समाजाची योग्य दिशेने वाटचाल सुरू झाली असे म्हणता येईल. समाज काय वाचतो, त्या समाजातील विचारवंत काय बोलतात, काय लिहितात हे पाहणे सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असते.

आजचे साहित्य अनेकदा घाईघाईत लिहिले जाते. त्यामुळे शब्दरूपी शस्त्रे गंजत चालली आहेत. त्यांची धार बोथट झाली आहे. कन्नडमधील भैरप्पांच्या कादंबऱ्यांवर मराठीत उड्या पडतात. सुधा मुर्तींची अनुवादीत पुस्तके खपतात. मात्र आपल्याकडील मराठी साहित्य त्याप्रमाणात खपत नाही. महाराष्ट्रात एकही प्रकाशक एकाही लेखकाच्या कादंबरीची दहा हजाराची आवृत्ती प्रकाशित करू शकत नाही. याचा विचार साहित्य परिषदेने केला पाहिजे पण याही बाबतीत कार्याध्यक्षांनी मला काहीही करू दिले नाही.

सध्याचा जीवन कलह खूप वाढल्यामुळे आणि अनेकांची घरे त्यांच्या कचेऱ्यांपासून लांब असल्यामुळे ते घरी आल्यावर थकून जातात आणि मग त्यांचे वाचनच होत नाही. यावर काही उपाय सुचतात का याचा परिषदेने विचार करायला हवा. हल्ली मराठीतील अनेक मालिकांमध्ये वापरली जाणारी भाषा अशुद्ध असते. यावर देखील साहित्य परिषदेने अंकुश ठेवणे मला गरजेचे वाटते. साहित्य प्राज्ञ आणि साहित्य विशारद या परीक्षांकडे तरूणांचा ओढा कसा वाढेल यासाठी साहित्य परिषदेने महाविद्यालयात जाऊन या परीक्षा लोकप्रिय होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कार्याध्यक्षांनी याबाबतीत काहीही केले नाही. याचा विचार कार्याध्यक्षांच्या मनात का आलेला नाही याचे मला आश्चर्य वाटत आहे. म्हणून ज्येष्ठ साहित्यिकांचे एक सल्लागार मंडळ कार्यकारिणीने स्थापन करावे आणि त्यांचे मार्गदर्शन गंभीरपणे विचारात घ्यावे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्यांच्या हातात अधिकार आहे त्यांनी इतरांचाही सल्ला घेऊन आपले धोरण अमलात आणावे. मराठी समाजाला अंतर्गत दुहीचा एक प्रकारचा शाप मिळालेला आहे. तो कमी होण्यासाठी विविध स्तरातील लोकांना साहित्य परिषदेकडे आकर्षित केले पाहिजे. आता दलित समाजातील अनेक नवे लेखक आणि कवी नावारूपाला आले आहेत. याचप्रमाणे श्रमिक वर्गातही अनेक साहित्यिक आहेत. त्यांचा सहभाग आपण वाढवायला हवा. या बाबतीतही कार्याध्यक्षांनी माझी मते कधीही जाणून घेतली नाहीत.

माझ्या कार्यकाळात प्राध्यापक मिलिंद जोशी यांचा प्रमुख कार्यवाह पदाचा राजीनामा ही एक दुर्दैवी घटना घडली याचे मला फार वाईट वाटले. मिलिंद जोशी हे प्रसिद्ध साहित्यिक, उत्तम वक्ते आणि प्रशासकीय जाण असलेले प्राध्यापक आहेत. त्यांचा सहभाग परिषदेला उपयोगी पडला असता. त्यांनी पुढील निवडणुकीनंतर साहित्य परिषदेत पुन्हा पदार्पण करावे असे मला मनापासून वाटते. कोणाशीही दीर्घकाळ दुरावा ठेऊ नये, हे मी यशस्वी नेतृत्व करणाऱ्या अनेकांपासून शिकलो. स्वामी विवेकानंद, येशू ख्रिस्त, गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि साने गुरूजी यांच्या विचारांचा माझ्यावर प्रभाव आहे. **पान ४ वर...**

# एक चतुरस्त्र साहित्यिक प्रा. मिलिंद जोशी

**प्राचार्य डॉ. प्र. चिं. शेजवलकर यांचे 'आठवणीतील माणसं' हे पुस्तक उत्कर्ष प्रकाशनाने २६ जानेवारी २०१४ रोजी प्रकाशित केले. या पुस्तकातील प्रा. मिलिंद जोशी यांच्याविषयीचा हा लेख...**

***माझी*** आणि तरूण वयात साहित्यक्षेत्रात प्रचंड नाव मिळालेले प्रा. मिलिंद जोशी यांची प्रत्यक्ष भेट केव्हा झाली आणि हळूहळू त्यांच्याशी झालेल्या परिचयाचं घट्ट मैत्रीत रूपांतर कसं झालं हे मला नेमकं आठवत नाही; पण जेव्हा मी त्यांचं भाषण पहिल्यांदा ऐकलं तेव्हाच त्यांनी मला त्यांच्या अमोघ वक्तृत्वानं कायमचं जिंकून टाकलं. त्यांच्याशी व्यक्तीगत संवाद साधायला मिळत रहावा म्हणून मी तसे प्रयत्न केले आणि तसे योगायोग वारंवार घडून आले. त्यांचा माझ्याशी होणारा संवाद मला हवाहवासा वाटू लागला आणि मी खरोखरीच त्यांच्या प्रेमात पडलो. साहजिकच त्यांनी ठिकठिकाणी लिहिलेले लेख मला वाचावेसे वाटले. त्यांची लेखनशैलीही त्यांच्या बोलण्याइतकीच आकर्षक होती आणि अजूनही आहे. त्यांच्या माझ्या वयात पंचेचाळीस वर्षांचे अंतर असूनही मला ते जवळच्या मित्रासारखे वाटू लागले. कधी त्यांचे मित्र सचिन ईटकर आणि कधी कधी ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार यांच्याबरोबर त्यांच्याशी होणाऱ्या गप्पांच्या मैफली रंगू लागल्या, तर कधी कधी कविराज उद्धव कानडे यांच्याबरोबरही काव्य, शास्त्र, विनोद या क्षेत्रातील विषयांवर बोलता बोलता संध्याकाळचे तीन चार तास कसे निघून जात हे मला अजूनही आठवतं.

माझ्या वयाचे वयस्कर स्नेही आता बऱ्याच वेळा बोलण्यात नकारात्मक सूर लावतात, पण मिलिंद जोशी यांच्या बोलण्यातून प्रचंड सकारात्मक दृष्टिकोन मला मिळत जातो आणि त्यामुळं मलाही आनंदानं जगण्याची प्रेरणा मिळते. विशेष म्हणजे माझे पूर्वीपासून सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहण्यासाठी महाराष्ट्र साहित्य परिषदेमध्ये जाणं येणं असे आणि मग तेथे त्यांची प्रसंगोचित भाषणं ऐकण्यात मला आनंद वाटत असे. त्यांचं व्यक्तिमत्त्व खरोखरीच लोहचुंबकासारखं आहे.

प्रा. मिलिंद जोशी यांचा जन्म उस्मानाबाद जिल्ह्यातील माणकेश्वर या लहानश्या गावी जुलै १९७२ रोजी झाला. पुढे त्यांचं बालपण बार्शी येथे गेल्याचं कळलं. तेथील प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण घेऊन झाल्यानंतर त्यांनी सिव्हिल इंजिनीअर या अभ्यासक्रमाची पदवी मिळवली आणि सुरूवातीला कराड येथे एका कंपनीत ते रूजू झाले. घरची परिस्थिती बेताची असल्यामुळं त्यांना लगेच नोकरीची गरज होती, पण त्यांचा जीव सिव्हिल इंजिनिअरींगच्या कामात रमेना. त्यांचा पिंड साहित्यिकाचा होता म्हणून ते भारती विद्यापीठात इंजिनिअरींग कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून दाखल झाले. शैक्षणिक क्षेत्रात असल्यामुळं त्यांना त्यांच्या आवडीच्या साहित्यवर्तुळात मिसळणं आवडू लागलं.



अनेक साहित्यिकांना ते हवेहवेसे वाटू लागले आणि आजही तसे वाटतात. भारती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शिवाजीराव कदम यांनी त्यांची साहित्य निर्मितीची सुप्त शक्ती ओळखली आणि त्यांना भारती विद्यापीठात संपर्क अधिकारी म्हणून पाचारण केलं. या नव्या भूमिकेतही त्यांचं योगदान शिवाजीराव कदम यांना लाखमोलाचं वाटलं. शिवाजीराव कदम हे दिलदार आणि दयाळू वृत्तीचे आहेत. त्यांना माणसांची पारख चांगली आहे. त्यामुळं मुळात साहित्यिक असलेल्या प्रा. मिलिंद जोशी यांना भारती विद्यापीठातही ही नवी भूमिका खूपच उत्तमरीतीनं पार पाडता आली आहे. मीही भारती विद्यापीठात नामदार डॉ. पतंगराव कदम आणि प्राचार्य डॉ. शिवाजीराव कदम यांच्या सान्निध्यात नेहमी राहत असल्यामुळं तेथेही मिलिंद जोशी यांच्या संपर्क अधिकारी म्हणून ते करीत असलेल्या कार्याचा प्रभाव मला दिसून आला. मी महाराष्ट्र साहित्य परिषदेचा अध्यक्ष व्हावं म्हणून त्यांनी मनापासून प्रयत्न केले आणि त्यामुळं अध्यक्षपदाचा मान मला मिळाला.

विशेष म्हणजे मिलिंद जोशी हे प्राचार्य शिव–ाजीराव भोसले यांचे चाहते आहेत. ते त्यांचे भक्तही आहेत. डॉ. शिवाजीराव कदम यांनाही ते देव मानतात आणि त्यांचा शब्द अखेरचा मानतात.

शिवाजीराव भोसले यांची वक्तृत्वशैली आणि लेखनशैली मिलिंद जोशी यांनी आत्मसात केली आहे. आम्ही सर्वजण मिलिंद जोशी यांना प्रति शिवाजीराव भोसले असंच म्हणतो. शिवाजीराव भोसले यांच्या निधनानंतर फलटण येथे त्यांनी केलेलं भाषण आणि त्यानंतर त्यांच्यावर त्यांनी लिहिलेला मृत्यू लेख हा अजून माझ्या ह्रदयात ठळकपणे बसलेला आहे. अनेक वर्षे प्राचार्य म्हणून आणि नंतर मराठवाड्यात कुलगुरू म्हणून प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचा सहवास मलाही लाभला. त्यांच्या 'जागर खंड १' या प्रकाशन समारंभाच्यावेळी मिलिंद जोशी यांच्यामुळं मला प्रमुख पाहुणे म्हणून भूमिका मिळाली.

मराठवाड्यात जन्मलेले आणि बार्शीहून सुरूवातीचं शिक्षण घेतलेले मिलिंद जोशी जेव्हा पुण्यात आले तेव्हा त्यांनी थोड्याच काळात आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा समाजावर उमटवला. ते मुळात जरी इंजिनिअर असले तरी मराठी साहित्य क्षेत्रातले जवळजवळ सर्व विश्व त्यांनी व्यापून टाकलं. आपल्या लेखननिर्मितीच्या अंगभूत कौशल्यानं त्यांनी वाचकांना भरभरून वैचारिक आणि प्रबोधनात्मक मेजवानी दिली. त्यांनी दै. सकाळ, लोकमत, लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, पुढारी, दिव्य मराठी, केसरी, प्रभात अशा सर्व नामवंत वृत्तपत्रातून आणि मासिकातून तसेच दिवाळी अंकातून विविध विषयांवर विपुल लेखन केलं. त्याचप्रमाणं दूरचित्रवाणी आणि आकाशवाणीसाठी अनेक मान्यवरांच्या मुलाखती घेतल्या. आकाशवाणीतील चिंतन या सदरासाठी लेखन केलं. त्यांच्या प्रकाशित साहित्यात मुबलक विविधता आहे. 'परिघातील विश्व', 'आठवणीतले शिवाजी सावंत', 'चरित्र अशी घडतात', 'प्राचार्य' हे शिवाजीराव भोसले यांचं चरित्र, 'नायजेरियात धोंडे पाटील', 'आपली मुलं घडविताना', 'तमाच्या तळाशी', 'हसण्यावारी', 'संतसाहित्य आणि आजची पिढी', 'शिक्षणातील आनंदयात्री', 'पानगळ', 'ऐसी कळवळ्याची जाती', 'शुभंकरांचा सांगाती' ही त्यांची प्रकाशित पुस्तकं उत्कृष्ट दर्जाची आहेत. त्यांचं 'पानगळ' आणि 'ऐसी कळवळ्याची जाती' ही अलीकडची दोन पुस्तकं मला खूपच आवडली.

एका वृत्तपत्रातून ते 'बोधिवृक्ष' या सदरा–खाली फार सुंदर विचार मांडतात. तेही चिंतननीय असतात. लेखनाबरोबरच दर्जेदार व्याख्यानं देण्याचा अभिनव पराक्रम करून त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात आणि महाराष्ट्रबाहेरही नाव मिळवलं. याशिवाय परदेशातही जाऊन त्यांनी सिंगापूर, दुबई, आबुदाबी, मलेशिया येथे आणि इतकंच नव्हे तर अमेरिकेतही व्याख्यानं दिली.

त्यांनी पुण्याच्या नामवंत वसंत व्याख्यानमालेसह महाराष्ट्रातील आणि बृहन्महाराष्ट्रातल्या सर्व व्याख्यानमालांतून विविध विषयांवर व्याख्यानं दिली. मी स्वत: त्यांची अनेक भाषणं ऐकली आहेत आणि त्यांचा श्रोत्यांशी होणारा संवाद मला आवडीने ऐकावासा वाटला आहे. त्यांची स्मरणशक्ती दांडगी असावी. हातात कोणतीही टिपणं न घेता ते श्रोत्यांशी उत्स्फूर्तपणे संवाद साधतात आणि त्यांचे विचार श्रोत्यांच्या ह्रदयाला जाऊन भिडतात.

त्यांची व्याख्यानं ऐकल्यावर आणि पुस्तकं वाचल्यावर तसं पाहिलं तर अगदी लहान वयात मिलिंद जोशी यांनी घेतलेली गरूडभरारी पाहून मिलिंद जोशी म्हणजे एक चमत्कार आहे असं मला नेहमी वाटत आलं आहे. त्यांची साहित्यक्षेत्रातील झेप एवढी मोठी आहे की केव्ह–तरी नजीकच्या काळात मराठी साहित्य संमेलनाचं अध्यक्षपदही त्यांना नक्कीच मिळू शकेल असं मी त्यांना नेहमीच म्हणत असतो. विटा येथे झालेल्या चौदाव्या ग्रामीण साहित्य संमेलनाचं त्यांचं अध्यक्षीय भाषण हा एक उत्कृष्ट मार्गदर्शनाचा नमुना होता. सांगली येथे डोंगरी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. फलटण येथे झालेल्या प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृती साहित्य संमेलनाचेही ते अध्यक्ष होते. 'पानगळ' या त्यांच्या कथासंग्रहाला नाशिकच्या सार्वजनिक वाचनालयाचा पु. ना. पंडित हा पुरस्कारही त्यांना मिळाला. याखेरीज 'प्राचार्य' या चरित्रग्रंथाला यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा जोशी साहित्य पुरस्कार, 'तमाच्या तळाशी' या कथासंग्रहाला गोपाळ बनहट्टी आणि बाईदेवी व्यास पुरस्कार, बार्शीच्या रोटरी क्लबतर्फे त्यांच्या लेखनक्षेत्रातील योगदानाबद्दल व्यावसायिक गुणवत्ता पुरस्कार असे अनेक पुरस्कार त्यांना मिळाले आहेत आणि यापुढेही अनेक मिळत राहतील.

महाराष्ट्रातील सार्वजनिक क्षेत्रात आणि साहित्यक्षेत्रात पूर्वी अनेक दिग्गज होऊन गेले आहेत. त्यांच्या रांगेत उभे राहण्याची विचारक्षमता मिलिंद जोशी यांच्याजवळ आहे. त्यांच्या रूपानं महाराष्ट्राला ही एक मिळालेली देणगी आहे. त्यांचं व्यक्तिमत्त्व म्हणजे उत्साहाचा एक प्रचंड धबधबा आहे. मला त्यांच्या या सर्व योगदानाबद्दल विशेष अभिमान वाटतो हे वेगळं सांगायला नकोच.

■■


## महाराष्ट्र साहित्य परिषदेला साहित्याभिमुख करण्यासाठी 'परिवर्तन आघाडी'ला विजयी करा

१) प्रा. मिलिंद जोशी (कार्याध्यक्ष) X

२) प्रकाश पायगुडे (प्रमुख कार्यवाह) X

३) सुनिताराजे पवार (कोषाध्यक्ष) X

**चला परिवर्तन घडवूया, साहित्य परिषद बदलूया !**

**स्थानिक कार्यवाह**

क्र. १ ज्योत्स्ना चांदगुडे X

क्र. २ नीलिमा बोरवणकर X

क्र. ३ स्वप्निल पोरे X

क्र. ६ घनश्याम पाटील X

**स्थानिक कार्यवाह क्र. ५**
वि. दा. पिंगळे
यांची बिनविरोध निवड

**शहर प्रतिनिधी**

नंदा सुर्वे X

प्रा. क्षितिज पाटुकले X

ॲड. श्रीधर कसबेकर X

**उमेदवाराच्या नावासमोर X (फुली) करून मतदान करावे, हे नम्र आवाहन.**
**आपल्या अमुल्य मतासोबत छायाचित्र असलेल्या आपल्या ओळखपत्राची झेरॉक्स प्रत जोडावी.**


## उत्साही व्यक्तिमत्त्व घनश्याम पाटील

***मसाप*** नक्की काय कार्य करते? हा माझ्यासारख्या अस्सल पुणेकरालाही प्रश्न पडतो. ही परिस्थिती बदलण्यासाठी आणि परिषदेचे कार्य साहित्याभिमुख तसेच लोकाभिमुख करण्यासाठी परिवर्तन आघाडीच्या माध्यमातून यावेळची निवडणूक लढवीत आहेत आमचे तरूण मित्र घनश्याम पाटील. पत्रकारिता आणि प्रकाशन क्षेत्रात गेली बारा वर्षे उत्कृष्ट कार्य करणारे सदैव उत्साही व्यक्तिमत्त्व.

'भले तरी देऊ कासेची लंगोटी, नाठाळाचे माथा हाणू काठी' ही तुकोबांची शिकवण अंगिकारणारी पाटलांची पत्रकारिता आहे. थेट आचार्य अत्र्यांची आठवण करून देणारी. कुठल्याही उद्योगधंद्याचे पाठबळ आणि त्यातून येणारा मिंधेपणा नसल्याने धडाकेबाज आणि रोखठोक लिखाण करायला ते जराही कचरत नाहीत. वयाची तिशी उलटायच्या आत दोन अग्रलेखसंग्रह त्यांच्या खाती जमा आहेत. प्रकाशन क्षेत्रातही प्रस्थापितांच्या मागे न लागता नवोदित पण गुणवंत लेखकांना प्रकाशात आणण्याचे कार्य ते सातत्याने करत आले आहेत. उद्योग व्यवसाय सांभाळून फावल्या वेळात साहित्यसेवा असा प्रकार इथे नाहीच. प्रकाशन आणि पत्रकारितेला त्यांनी पूर्णवेळ वाहून घेतले आहे. या स्वयंभू कर्तृत्त्वामुळे साहित्य परिषदेच्या कार्यकारिणीवर निवड होण्याचा त्यांचा निश्चितच हक्क आहे. तो मिळवून देण्यासाठी घनश्याम पाटील यांना आपले बहुमोल मत जरूर द्या, हीच सर्व सुजाण मतदारांना नम्र विनंती!

**■अरूण कमळापूरकर, पुणे**
९९२२३४४०३३

# साहित्य क्षेत्रातील धडधडती तोफ

**'चपराक प्रकाशन'तर्फे दरवर्षी 'चपराक साहित्य महोत्सवा'चे आयोजन करण्यात येते. ८ ऑगस्ट २०१५ रोजी 'चपराक'चा तिसरा साहित्य महोत्सव डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या अध्यक्षतेखाली आणि ८८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. सदानंद मोरे यांच्या उप-स्थितीत पार पडला. त्यावेळी 'चपराक'तर्फे तब्बल पंधरा पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. या अनुषंगाने 'चपराक प्रकाशन'चे प्रकाशक घनश्याम पाटील यांच्या वाटचालीचा सुप्रसिद्ध साहित्यिक ह. मो. मराठे यांनी सोलापूर येथील दै. 'संचार' मधून घेतलेला आढावा...**



**घनश्याम** पाटील याची आणि माझी ओळख तशी अलीकडीलच. झाली असतील चार पाच वर्षे. या पाच वर्षातल्या गाठीभेटीतून आणि त्याच्याबरोबरच्या गप्पांतून मला त्याच्या व्यक्तिमत्त्वामधले काही गुण ठळकपणे जाणवलेच. तो उत्साहाने उसळणारा तरूण आहे. त्याला खूप काही करायचं आहे. त्याने खूप मोठी स्वप्नं मनात पाहिली आहेत. ती प्रत्यक्षात आणायचीच, या दृष्टीने तो नुसता बोलत बसलेला नाही, तर त्याने त्या दृष्टीने योजना आखल्या आहेत. तो कामाला लागला आहे.

आपल्या 'साहित्य चपराक' या मासिकाचा दिवाळी अंक चारशे पानांचा काढायचा असे त्याने ठरवले आहे! चारशे पानं मजकूर! जाहिरातींची पानं वेगळी. हा त्याचा एक विक्रमच ठरेल एवढं नक्की! प्रती? निदान पंचवीस हजार! मला दिवाळी अंकांचं संपादन करण्याचा अनुभव आहे, पण फक्त संपादनाचा. मालकांनी जेवढी पानं मजकूर हवा असं सांगितलं असेल, तेवढा मजकूर जमा करणं हे माझं काम. कागद, छपाई, जाहिराती, मार्केटिंग ही जबाबदारी माझी नाही! पण घनश्यामच्या बाबतीत या सर्व जबाबदाऱ्या त्याच्या एकट्याच्याच आहेत! सामान्य वाचकांना कल्पनाही येणार नाही की हे सर्व काम म्हणजे केवढा खटाटोप असतो! अगदी तरूण वयात घनश्यामची ही जबाबदारी पेलायची तयारी झालेली आहे. त्याची ही योजना त्याने यशस्वीपणे अंमलात आणली तर त्याने अगदी अल्पावधीतच नेत्रदीपक यश मिळवलं हे मान्य करावं लागेल.

त्यांच 'चपराक' नावाचं साप्ताहिकही आहे. एक साप्ताहिक आणि एक मासिक एवढं त्याने या वयातच सुरू केलं आहे. साप्ताहिकात तो दर आठवड्याला अग्रलेख लिहितो. ते निर्भीड, सडेतोड आणि निर्भयपणे लिहिलेले असतात. ज्यांचं गुणवर्णन श्री. शरद पवार यांची 'राष्ट्रवादीचे सुविद्य आमदार आणि ओबीसींच्या नेतृत्त्वाचा नवा चेहरा' असं केलं त्या आमदार जितेंद्र आव्हाडांनी अलीकडेच बाबासाहेब पुरंदरे यांना 'महाराष्ट्र भूषण' देण्याच्या मुद्द्यावरून अत्यंत स्फोटक भाषण केलं. त्याच्या बातम्या वर्तमानपत्रात आल्या. 'पुरस्कार देण्यात आला तर महाराष्ट्र पेटवू' अशी भाषा आव्हाडांनी वापरली. आव्हाड यांच्या या भाषेवर परखड आणि स्पष्ट टीका करणारा अग्रलेख त्याने अलीकडेच लिहिलाही होता. तो आपल्या साप्ताहिकात छापलाही होता. आमदार आव्हाडांसारख्या मा. शरद पवारांच्या 'लाडक्या' नेत्यावर टीका करणं महाराष्ट्रात सोपं उरलेलं नाही. घनश्याम त्याचं 'चपराक' साप्ताहिक माझ्याकडे भेटीदाखल पाठवतो. मी ते वाचतो. त्याच्या अग्रलेखातला सडेतोडपणा मी अनेकदा अनुभवला आहे.

अलीकडे घनश्याम पुस्तक प्रकाशनाच्या व्यवसायाकडे वळला आहे. आजपर्यंत त्याने अनेक पुस्तके प्रकाशित केली असून येत्या ८ ऑगस्टला तो आणखी १५ पुस्तकं एकाचवेळी प्रसिद्ध करणार आहे. एकाचवेळी अनेक पुस्तकं प्रसिद्ध करणं हेही सोपं नाही. वेगवेगळ्या विषयांवरची पुस्तकं वेगवेगळ्या लेखकांकडून मिळवणं हे पहिलं काम. ती एकाचवेळी छापून मिळण्याची व्यवस्था हे दुसरं काम. त्यासाठी छापखान्याच्या मालकाला आगाऊ बिलाची रक्कम देणं आणि उरलेल्या बिलासाठी क्रेडीट मिळवणं हे तिसरं काम. बातमी यावी यासाठी पंधरा पुस्तकांच्या प्रकाशन समारंभाची आखणी करणं हे पुढलं काम. पाहुणे मिळवणं, हॉल आधीच बुक करणं, समारंभाची सर्व आखणी करणं आणि त्याप्रमाणे समारंभ पार पाडणं हे पुढलं काम! अशी अनेक टप्प्यांवरची कामं पार पाडणं आणि तिही वेळच्यावेळी, यासाठी मॅनेजमेंटचं कौशल्य आवश्यक आहे. ते कौशल्यही घनश्यामने आत्मसात केलं आहे.

घनश्याम मराठवाड्यातल्या एका शेतकरी कुटुंबातून दहावी झाल्यावर पुण्यात आला तो पत्रकारितेच्या ओढीने. 'संध्या' या नावाचं कै. वसंतराव काणे यांचं एक सायंदैनिक पुण्यातून प्रकाशित होत असे. तिथं त्याला पत्रकारितेची नोकरी मिळाली. त्याची राहण्याची सोयही वसंतराव काणे यांनी ऑफिसमध्येच केली. नोकरी करीत करीत त्याने बारावी केली आणि सरळ पत्रकारिता सुरू केली. याचा अर्थ स्वत:चं छोटंसं साप्ताहिक सुरू केलं. धीरे-धीरे त्यानं साप्ताहिकाला मासिकाची जोड दिली. मासिकाचे काही हजार वर्गणीदार असणं ही आजच्या काळात अशक्य वाटणारी गोष्ट आहे. हजारोंच्या घरात त्याचा हुकुमी वाचक आहे. तसाच तो हुकुमी ग्राहक आहे. त्याने याआधी प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांच्या चार-चार, पाच-पाच आवृत्त्या निघाल्याचं तो अभिमानानं सांगतो. त्याचं प्रत्येक पुस्तक घेणारे दहा हजार वाचक मिळाले तरी तो आपल्या पुस्तकांची पहिली आवृत्तीच दहा हजार प्रतींची छापू शकेल आणि तोही एक मराठी प्रकाशन व्यवसायातला कौतुकास्पद असा विक्रमच ठरेल!

तरूण वयातच घनश्यामने वैचारिक प्रगल्भता आणि स्पष्टता प्राप्त केली आहे. याची अनेक उदाहरणं त्याने लिहिलेल्या अग्रलेखांतून सापडतात. त्याने आपल्या निवडक अग्रलेखांची पुस्तके 'दखलपात्र' व 'झुळूक आणि झळा' या नावाने प्रसिद्ध केली आहेत.

**त्यातील काही उदाहरणे बघा...**

१) एखादी नदी सराईतपणे पोहत पार करताना आम्ही बेभान होतो कारण नदीच्या दुसऱ्या काठावर जाण्याची आमची प्रचंड ओढ असते. काऱ्र्याच्या एकवीरा आईच्या किंवा जेजुरीच्या खंडोबाच्या पायऱ्या चढताना आम्ही कधीही थकत नाही कारण मन प्रफुल्लीत करणाऱ्या त्या गूढ शक्तीची दृढ आस मनी असते. विविध ग्रंथ वाचताना आम्ही किती पाने उलटली याचे आम्हास यत्किंचितही भान नसते कारण ज्ञानामृत प्राशन करण्याची आमची लालसा असते. यशाचे शिखर पादाक्रांत करताना काही समदु:खी लोकांनी घातलेले घाव आम्हास इजा पोहोचवत नाहीत कारण आमच्या प्रबळ आत्मविश्वासाची शक्ती आम्हांस संरक्षण देत असते. मग समाजातल्या तथाकथित थोतांड प्रवृत्तींची पर्वा आम्ही का करावी? दुष्ट विचारांना, चुकीच्या प्रवृत्तींना 'चपराक' देण्यासाठीच आमचा जन्म आहे. यासाठी आम्हाला संघटितपणे साथ देणारे आमचे सहकारी आम्हांस 'घनश्यामा'प्रमाणे वाटतात. शत्रू पक्षाकडून येणारे अनंत अडचणींचे बाण हृदयावर हळूवारपणे झेलत ते आमचे सारथ्य करीत आहेत. असे सहकारी असताना पराक्रमाची परंपरा कधीही खंडीत होणार नाही, हे त्रिकालाबाधीत सत्य आहे. (दखलपात्र, पान नं. २३)

हे वाचताना वाटते की आचार्य अत्रे, लोकमान्य टिळक किंवा शिवराम महादेव परांजपे यांच्यासारख्या तगड्या संपादकानेच ही आत्मविश्वासपूर्ण, जोरकस आणि आव्हानात्मक शैली वापरली असावी; पण ही भाषा आणि शैली तीस वयाच्या घनश्यामची आहे हे पाहून मी तर अगदी थक्क झालो. केवढी ओघवती शैली, केवढा आत्मविश्वास आणि पत्रकार म्हणून स्वीकारलेल्या ध्येयपथावरील भावी वाटचालीबद्दलचा केवढा हा आत्मप्रत्यय!

२) प्रत्येक जातीत काही गुणदोष असतात हे मान्य! मात्र त्यामुळे एखाद्या जातीचा टोकाचा द्वेष करणे आणि 'त्यांच्या कत्तली करा', 'त्यांच्या बायका पळवून आणा' अशा घाणेरड्या वल्गणा करून समाजस्वास्थ्य खराब करणे हे समाजातील वाढत्या अराजकतेचे लक्षण आहे. आजपर्यंतच्या अनेक ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक चळवळीत ब्राह्मणांनी दिलेले योगदान दुर्लक्षून चालणार नाही. समाज 'भटमुक्त' करण्याचा विडा उचलणाऱ्या फुरफुरत्या घोड्यांना आवरले नाही तर त्याचे गंभीर परिणाम आपल्या राष्ट्राला भोगावे लागतील. (दखलपात्र, पान नं. ७९)

अगदी तरूण वयातच घनश्यामने 'हाही' विषय अग्रलेखासाठी घेण्याचे धाडस दाखवले.

३) पहिल्या सत्रात विरोधी पक्षात असलेल्या शिवसेनेचा आता सत्तेत सहभाग आहे. निवडणुकीपूर्वी काँग्रेस-राष्ट्रवादीच्या गैरव्यवहारावर तुटून पडलेल्या भाजपला त्यांनी पाठिंबा दिला आहे. दिल्लीत विमानतळावरून देसाईंचे परत येणे असेल किंवा राज्य मंत्रीमंडळात दिलेली पदे निमूटपणे स्वीकारणे असेल, या सर्व प्रकारात शिवसेनेने अवहेलना, उपेक्षा सहन केली आहे. ही उपेक्षा पदाच्या, सत्तेच्या लालसेपोटी नाही. राज्याचे, देशाचे काहीतरी भले होणार, भ्रष्ट नेत्यांवर कारवाई होणार या आशेवर शिवसेनेने नमते घेत त्यांना प्रामाणिकपणे पाठिंबा दिला आहे. 'राष्ट्रवादीच्या जीवावर आपण उड्या मारू' अशा आविर्भावात असलेल्या 'फडणवीस अॅन्ड कंपनी'ला पवारांनी एका झटक्यात जागेवर आणले आहे. 'सरकार स्थिर रहावे यासाठी पाठिंबा दिला असला तरी सरकार टिकावेच यासाठीचा मक्ता आपण घेतला नाही' असे त्यांनी सांगताच यांचे डोळे उघडले. पुन्हा अनंत तडजोडी करत त्यांनी शिवसेनेशी जमवून घेतले. मात्र दिलेल्या शब्दाला जागत त्यांनी आपली आश्वासने पाळली नाहीत, तर शिवसेना कोणत्याही क्षणी स्वाभिमानाने सत्तेतून बाहेर पडेल आणि पुन्हा बहुमताने सत्तेत येईल, असे सध्याचे एकंदरीत चित्र आहे.

'रॉंग नंबर' लागला तर त्यांना तसे धाडसाने सांगणे हे आता प्रत्येक नागरिकाचेही कर्तव्य आहे. तसे झाले नाही तर सत्तेच्या कैफात असणाऱ्यांचे डोळे कदापि उघडणार नाहीत. (झुळूक आणि झळा, पान नं ४०)

पंतप्रधान मोदींच्या सरकारकडून अपेक्षाभंग होऊ लागल्याची जाणीव आणि शिवसेना-भाजप संबंधावरचा मार्मिक अभिप्राय.

साहित्य क्षेत्रात अशी धडधडती तोफ म्हणून वाचकांपुढे आलेला घनश्याम उत्तम लेखक आणि म्हणूनच तो प्रकाशक म्हणून इतर लेखकांना योग्य न्याय देऊ शकतो. 'चपराक'चा हा साहित्य महोत्सव हे त्याचेच प्रतिक आहे. त्याच्या भावी वाटचालीस माझ्या शुभेच्छा!

■ **ह. मो. मराठे**
सुप्रसिद्ध साहित्यिक आणि समाजचिंतक
९४२३०१३८९२

## दखलपात्र



**सुप्रसिद्ध साहित्यिक आणि पत्रकार ह. मो. मराठे यांनी 'चपराक'चे संपादक घनश्याम पाटील यांच्या 'दखलपात्र' या अग्रलेखसंग्रहाचा परिचय करून दिला. गोव्यातील 'गोमन्तक' या आघाडीच्या वृत्तपत्राने तो प्रकाशित केला. त्यातील काही अंश...**

***पुणे*** येथून प्रसिद्ध होणारे 'चपराक' हे एक छोटेसे साप्ताहिक असून त्याचे युवा संपादक घनश्याम पाटील यांनी अलीकडच्या तीन - चार वर्षांत लिहिलेल्या अग्रलेखांचे 'दखलपात्र' हे पुस्तक आहे. पाटील हे मराठवाड्यातून शिक्षणासाठी म्हणून पुण्यात आले आणि पुणे येथेच पत्रकारितेत रमले. आधी काही वर्षे एकदोन छोट्या वर्तमानपत्रात त्यांनी नोकरी केली आणि त्या अनुभवाच्या आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी अगदी तरुण वयात आपली प्रकाशनसंस्था सुरू केली. तिच्यामार्फत त्यांनी दिवाळी अंक, पुस्तके, साप्ताहिक आणि एक मासिक सुरू केले. साप्ताहिकातून छापलेल्या आपल्या निवडक अग्रलेखांचे पुस्तकही छापले. ज्याच्या अग्रलेखांचे पुस्तक इतक्या तरुण वयात निघाले असा घनश्याम हा अलीकडच्या काळातला एक अपवादात्मक पत्रकार असावा!

त्याचे अग्रलेख वाचताना त्याच्या अग्रलेखातल्या शैलीचा भारदस्तपणा, विचारांचे गांभीर्य, वैचारिकतेची निश्चित दिशा, भाषेचा समुचित आणि प्रभावी वापर जाणवला. या अग्रलेखांची शब्दमर्यादा पाचसातशे शब्दांचीच असली तरी ते वाचताना त्याची निर्भीड आणि निर्भय वृत्ती शब्दाशब्दात जाणवते. एखाद्या नेत्यावर ज्या शब्दांत टीका करणे मोठमोठ्या वर्तमानपत्रांच्या संपादकांनाही आज शक्य नाही, अशा नेत्यांवर त्याने बिनधास्तपणे आपली धारदार लेखणी चालवली आहे. मग ते अजित पवार असोत, भुजबळ असोत, सुशीलकुमार असोत की असोत अण्णा हजारे! आजच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक बजबजपुरीतून भारत देश बाहेर काढून तो योग्य मार्गावर आणण्याची एक आंतरिक तळमळ त्यातून प्रगट होते. हे काम तरुण पिढीला करायलाच हवे, असा ध्येयवादी त्यातून प्रगट होतो.

त्याच्या काही अग्रलेखांची शीर्षकेही याची खात्री पटवतील. उदा. 'ही लढाई जिंकलीच पाहिजे', 'कुणाचे पुण्य, कुणाचे भूषण?', 'होयबांच्या गर्दीतला नेता', 'बोलतील, हसतील अन् गाडतीलही', 'विधायक विचारांचा जागर घाला', 'ब्राह्मणद्वेष थांबवा, राष्ट्र वाचवा' इत्यादी. अग्रलेखांची ही शीर्षके नमुन्यादाखल वाचली तरी त्यावरून घनश्यामच्या विचारांची, ध्येयदृष्टीची दिशा समजते. चटकदार आणि उत्कंठावर्धक शीर्षके हे आचार्य अत्रे, ग. वा. बेहेरे, गोविंद तळवलकर वगैरे संपादकांचे वैशिष्ठ्य होते. ते वैशिष्ठ्य घनश्यामने जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

सध्या मराठी वृत्तपत्रसृष्टीचे प्रचंड वेगाने व्यापारीकरण होत आहे. शेकडो कोटी रूपयांची उलाढाल होत आहे; पण कधी कधी शंका येते की, या वृत्तपत्रसृष्टीला काही सामाजिक ध्येयदृष्टी आहे काय? शेकडो कोटींची उलाढाल करणाऱ्या वृत्तपत्रांना अनेक दडपणांना तोंड द्यावे लागते. छोटी वृत्तपत्रे तर सदैव दडपणाखालीच जगत असतात. पाठीमागे कोणीही भांडवलदार नसताना छोटेसे पण ध्येयदृष्टी असलेले एक साप्ताहिक चालवण्याची युवा मनाची ऊर्मी या अग्रलेखांतून जाणवते, हे सद्यस्थितीत फार कौतुकास्पद वाटते.

## महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्याध्यक्षा माधवी वैद्य यांची ही पहा 'नेत्रदीपक' कामगिरी



■ साहित्य परिषदेतील कॉफी क्लब, युवा मंच, बालमंच, नाट्य विभाग, नवं कोरं, युवा साहित्य नाट्यसंमेलन, आजी-आजोबांच्या गोष्टी, समीक्षकांचे संमेलन इत्यादी गोष्टी बंद पाडणे.

■ धर्मादाय आयुक्तांनी त्यांना केलेला रुपये पाच हजारचा दंड साहित्य परिषदेच्या तिजोरीतून भरणे.

■ साहित्य संमेलने धनदांडग्यांना विकणे.

■ साहित्य संमेलनातील सांस्कृतिक कार्यक्रमांची कंत्राटे स्वत:च्याच संस्थेला व जवळच्या व्यक्तींना देणे.

■ साहित्य संमेलनाच्या कार्यक्रमात तीन पानांच्या संहितेसाठी तीस हजार रूपये घेणे.

■ साहित्य महामंडळाच्या वर्धापनदिन समारंभ चर्चासत्रात स्वत:च्या जावयाची वर्णी लावणे.

■ मसापचे कार्यालय स्वत:च्या संस्थेच्या कामासाठी वापरणे व तिथून पत्रव्यवहार करणे.

■ साहित्य संमेलनाच्या स्थळ निवड समीतीत असताना नेसायच्या पैठण्या आणि महागड्या साड्या संयोजक संस्थांकडून घेणे.

■ संमेलनाच्या नावाखाली पतीसह फुकट विमानवाऱ्या व पर्यटन करणे.

■ पदाचा गैरवापर करीत पंचतारांकित सुविधांचा उपभोग घेणे.

■ संस्थेच्या अध्यक्षांना कसलीही किंमत न देता त्यांना सतत अपमानीत करणे.

■ मनमानी कारभाराद्वारे साहित्यिकांना अपमानीत करणे व तुच्छ लेखणे.

■ एरवी सतत पत्रकार परिषदा घेऊन प्रसिद्धीच्या झोतात राहणे आणि सर्वसाधारण सभेला तोंड दाखवण्यास घाबरणे.

■ 'स्त्री असल्यामुळे पुरूषी मानसिकतेतून माझ्यावर टीका होते' असे म्हणत स्वत:चे खोटे समर्थन करणे.

■ अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय निवडणुकीत गैरव्यवहार केल्या प्रकरणी प्रसिद्ध कादंबरीकार विश्वास पाटील यांनी मुंबईत पोलीसांकडे तक्रार दाखल केली

**तुषार उथळे पाटील**
९५५२८५८१००

पान १ वरून...

## प्रा. जोशी यांची परिषदेला आवश्यकता...

त्यामुळे जे काही माझ्या वाट्याला काम आले ते मानसिक ताण न ठेवता प्रसन्न मनाने जेवढे करता येईल तेवढे करावे अशीच माझी धारणा आहे आणि त्यामुळेच इतर सामाजिक संस्थांमध्ये आणि पुणे विद्यापीठातही बिनविरोध निवडून येऊन, सगळ्यांची मने जिंकून मला काम करता आले. त्या मानाने महाराष्ट्र साहित्य परिषदेत मला स्वतःला अपेक्षित असलेले माझे योगदान मला नीट करू देता आले नाही. कारण येथेही कार्याध्यक्षांनी मला जाणूनबूजून एखाद्या खड्यासारखे दूर ठेवले. सर्वांची नाराजी पत्करून कार्याध्यक्षांनी गैर कारभार करीत राहणे कितपत योग्य आहे याचा त्यांनी स्वतः विचार करावा असे मला वाटते.

काहीजण डॉ. माधवी वैद्य यांच्याविरूद्ध अविश्वासाचा ठरावही मांडणार होते पण त्यासाठी पंधरा दिवसाची नोटीस द्यावी लागते. डॉ. माधवी वैद्य यांनीच आता सदस्यांचा आणि अध्यक्षांचा विश्वास बसण्यास आपण पात्र आहोत का? याचा विचार केला पाहिजे. कार्याध्यक्षपदी खरे म्हणजे नामवंत साहित्यिक असावा पण तसे झालेले नाही. सध्याच्या कार्याध्यक्षांचे साहित्यिक योगदान नगण्य आहे हे खेदाने म्हणावेसे वाटते. मंगला गोडबोले, अच्युत गोडबोले, संतसाहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. अशोक कामत, डॉ. अरूणा ढेरे ही व अशी नामवंत साहित्यिक मंडळी कार्याध्यक्षपदी शोभून दिसली असती. गेल्या वर्षभरात विश्वस्तांची एकही सभा बोलावण्यात आली नाही. विश्वस्तांची सभा घेण्यासंबंधी कोषाध्यक्षांनी मला एक पत्र लिहिले होते. मी त्यांना तारखाही दिल्या होत्या; पण पुढे काय झाले हे मलाही कळले नाही. असो.

१९५३ मध्ये, म्हणजे ६२ वर्षांपूर्वी, त्यावेळी माझे निवासस्थान साहित्य परिषदेच्या जवळ असल्यामुळे, मी नियमितपणे वृत्तपत्रे आणि मासिके वाचण्याकरता परिषदेत येत होतो आणि परिषदेच्या त्यावेळच्या सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहत होतो, तसेच १९५६ मध्ये म्हणजे एकोणसाठ वर्षांपूर्वी मी कै. गं. भा. निरंतर यांच्या प्रेरणेने आणि कै. म. श्री. दीक्षित यांच्या पाठींब्यामुळे साहित्य परिषदेच्या परीक्षा दिल्या. त्याच साहित्य परिषदेमध्ये आपण सर्वांनी मला अध्यक्षपदी नियुक्त केले याची कृतज्ञतेने मला आज आठवण येत आहे. मराठी हा माझा आवडता विषय असल्यामुळे मी तेव्हापासून आजपर्यंत महाराष्ट्र साहित्य परिषदेला दैवत मानत आलेलो आहे.

**आपणही 'चपराक'चे सभासद अवश्य व्हा!**

**वार्षिक वर्गणी (सर्व विशेषांकासह)**
साप्ताहिकासाठी २०० रूपये | मासिकासाठी ५०० रूपये
**संपर्क :** ०२०-२४४६०९०९ / ९५५२८५८१००

# लिहिणारे आणि लिहिते करणारे घनश्याम पाटील



***साधारणपणे*** २०११ साली पत्रकारितेत येण्याचा विचार मनात आला. त्यामुळे अनेक थोरा-मोठ्या पत्रकारांच्या भेटी घेतल्या. त्यावेळी अनेकांनी वाचन वाढविण्याचा सल्ला दिला. त्यानुसार ऑक्टोबर महिन्यात ग्रंथालयाचा सभासद होण्यासाठी काय करावे लागेल याची माहिती घेण्यासाठी पुणे मराठी ग्रंथालयात गेलो. त्यावेळी समोरच्या एका रॅकमध्ये असलेले एक मासिक सहज चाळण्यासाठी घेतले. पत्रकारितेचा आरंभ करताना मासिक म्हणजे काय असते हे पहिल्यांदाच पाहत होतो. त्याचवेळी त्या मासिकाचे नाव थोडं विचित्रच वाटलं. नाव तसं नियमित ऐकण्यातलं, मात्र ते मासिकाचं नाव असणं थोडं हटके वाटलं. अंक चाळत गेलो तेव्हा त्यातील विषयही वाचले. बसल्या बसल्या त्यातील संपादकीय लेखावर सहज नजर गेली. चार ओळी वाचाव्या म्हणून हाती घेतल्या आणि संपूर्ण लेख वाचून कधी झाला ते कळले नाही. मेंदूला झिणझिण्याच आल्या. लेख वाचल्यानंतर खाली नाव होते, घनश्याम पाटील, संपादक, साहित्य चपराक. मला वाटले कोणीतरी बुजुर्ग व्यक्ती असावेत. कारण त्यातील भाषाच तशी पोक्त होती. म्हणून संपूर्ण संपादक मंडळ पाहिले. त्याचवेळी त्याखाली एक ओळ लिहिली होती, अंकातील मजकुराशी संपादक कदाचित सहमत असतीलही. ही एक वेगळीच धाटणी पाहून या संपादकांना भेटावे असे वाटले. ताबडतोब त्यातील नंबरवर फोन लावला मात्र तो फोन काही रिसिव्ह झाला नाही.

त्यानंतर काही दिवस असेच गेले. ते मासिक विवेकानंद केंद्रातही पाहायला मिळाले. त्यात आमचे सोलापूरचे मित्रवर्य सिद्धाराम पाटील यांचा 'कसाब निर्मिती कारखान्याचे काय?' हा लेख वाचायला मिळाला. लागलीच सिद्धाराम पाटलांना फोन केला. 'चपराक'च्या संपादकांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांनी लागलीच घनश्याम पाटील यांना फोनाफोनी करून भेटण्याचा मार्ग मोकळा करून दिला. पुढे १० नोव्हेंबरला त्यांनी भेटण्याची वेळ दिली आणि भेट झाली. त्यांना भेटल्यानंतर हेच संपादक असल्याचा विश्वास बसेना. कारण आपल्या वयाचा संपादक असू शकतो हे पहिल्यांदाच पाहत होतो. त्यातही तो मेंदूला झिणझिण्या आणणारा अग्रलेख वाचून तर त्यावर विश्वासच बसेना. पहिल्या भेटीतच मी घनश्याम सरांना कामाची संधी देण्याची विनंती केली. त्यांनीही लागलीच रूजू होण्यास सांगितले आणि ११ नोव्हेंबर २०११ पासून माझ्या पत्रकारितेला सुरूवात झाली.

त्या दिवसापासून घनश्याम पाटील हे रसायन समजून घेण्याचा प्रयत्न आजतागायत सुरू आहे. घनश्याम पाटील यांच्या सहवासात अनेक दिवस काम केले. त्या काळात त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक पैलू मला अनुभवायला मिळाले. साहित्याबाबतची त्यांची तळमळ अनेक घटनांमधून समोर येते. त्यांचे साहित्यप्रेम सांगणारी एक घटना म्हणजे उमेश सणस लिखित 'शिवप्रताप' ही 'चपराक प्रकाशन'ची पहिली वहिली कादंबरी. एप्रिल २००६ साली या कादंबरीचे प्रकाशन ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते झाले. त्यानंतरचा हा प्रसंग. साताऱ्यामधील एका पुस्तक विक्रेत्याने साधारण सायंकाळच्या सुमारास फोन केला. ''शिवप्रताप कादंबरीच्या पाच प्रती हव्या आहेत. आमचे एक ग्राहक उद्या अमेरिकेला जाणार आहेत. त्यांना तेथील मराठी भाषिकांसाठी या प्रती हव्या आहेत.'' त्यावर प्रकाशक या नात्याने घनश्याम पाटील यांनी त्यांना शब्द दिला की, ''सकाळी ७ वा तुम्हाला कॉपीज मिळतील.'' त्यानुसार पाटील यांनी थंडीची तमा न बाळगता रातोरात दुचाकीवर प्रवास करून सकाळी सात वाजता त्या पुस्तक विक्रेत्याला शिवप्रतापच्या पाच प्रती पोहोच केल्या. प्रकाशक स्वतः या प्रति घेऊन आले आहेत हे कळल्यानंतर मात्र तो पुस्तक विक्रेता आश्चर्यचकीत झाला. ''केवळ पाच प्रती देण्यासाठी आपण एवढ्या दूर प्रवास करून आलात. यात तुम्हाला काय फायदा मिळणार?'' त्यावर पाटील म्हणाले, ''यातून आर्थिक फायदा जरी मिळणार नसला तरी या सुंदर कलाकृतीपासून अमेरिकेतील माझे मराठी बांधव दूर राहू नयेत अशी माझी इच्छा आहे. शिवाय एखाद्या लेखकाचे किंवा प्रकाशकाचे पुस्तक अमेरिकेत वाचले जाणार असेल तर त्याहून मोठा आनंद कोणता?'' घनश्यामजींनी दिलेले उत्तरच त्यांची साहित्यविषयक तळमळ व्यक्त करते. एखाद्या क्षेत्राबाबतची तळमळ आव आणून शब्दातून व्यक्त करू शकतो मात्र प्रत्यक्ष कृतीतून दिसणाऱ्या तळमळीला तोडच नसते. घनश्यामजींची तळमळ ही कृतीशील होती.

भेटायला येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला ते लिहिण्यासाठी उद्युक्त करतात. बस्स. लोकांनी लिहितं व्हावं यासाठी ते कायम आग्रही असतात. नवीन लेखक लिखाणाबाबत टीप्स मागायला आल्यावर ते सांगतात, ''जो चांगला विचार करू शकतो तो चांगले लिहू शकतो.'' लिखाणासाठी त्यांनी अनेकांना प्रोत्साहन दिले आहे. त्यातील एक जिवंत उदाहरण म्हणजे मी स्वतःच. घनश्यामजी नसते तर कदाचित मी आज पत्रकारितेत नसतो. लिखाणाचे सर्व धडे त्यांच्याकडूनच घेतले. २०१४ च्या दिवाळी अंकासाठी त्यांनी मला लेख लिहायला सांगितला. त्यानुसार कन्याकुमारी येथील विवेकानंद शिलास्मारक आणि विवेकानंद केंद्राचे संस्थापक एकनाथजी रानडे यांच्या कार्याचा आढावा घेणारा एक लेख मी लिहिला. अंक प्रकाशित झाल्यानंतर त्यांनी मला सांगितले की, ''एकनाथजींवर आपण एक पुस्तक लिहावे.'' त्यावेळी माझ्यात तो आत्मविश्वास नव्हता मात्र घनश्यामजींनी ज्या पद्धतीने मला आत्मविश्वास दिला त्यामुळे मी ते लिहू शकलो.

घनश्याम पाटील यांची पार्श्वभूमी आपल्याला आश्चर्यचकीत करते. कारण मराठवाड्यासारख्या दुष्काळी भागातून येऊन पुण्यासारख्या शहरात आपले साप्ताहिक, मासिक आणि प्रकाशन संस्था चालवणे तशी सोपी गोष्ट नाही. इयत्ता सातवीच्या वर्गात असल्यापासून घनश्यामजी पत्रकारितेत आहेत. सुरवातीला किल्लारी भूकंपानंतर सोलापूर तरूण भारत या वृत्तपत्राचे किल्लारी वार्ताहर म्हणून त्यांनी काम पाहिले. दहावी झाल्यावर त्यांनी पुण्याकडे कूच केली. अकरावीला असतानाच त्यांनी ज्येष्ठ संपादक वसंतराव काणे यांच्या दै. संध्या या सायं दैनिकात कामाला सुरूवात केली. संध्या हे राज्यातील पहिले सायं दैनिक. त्यामुळे त्याला मोठी परंपरा. वसंतराव काणे यांच्या मुशीतच त्यांची आणखी जडण घडण झाली. काही कारणाने संध्यातील काम सोडल्यानंतर त्यांनी स्वतःचे मासिक सुरू करण्याचे ठरविले. बारावीच्या वर्गात असताना त्यांनी 'चपराक' हे मासिक सुरू केले. वयाच्या सतरा-आठराव्या वर्षी संपादकपद भूषवणारे राज्यातील ते एकमेव संपादक असावेत. ज्या वयात आपण कोणत्या क्षेत्रात जायचे याबाबत साशंकता असते त्या वयात घनश्यामजी एका मासिकाचे संपादक होते. २००३ साली त्यांनी 'चपराक'ची सुरूवात केली. त्यानंतर पुढे दैनिकही चालवले. गेल्या १३ वर्षापासून 'चपराक'ने राज्यासह राज्याबाहेरही आपली ओळख निर्माण केली आहे.

गेल्या १३ वर्षापासून घनश्यामजी अविरतपणे साहित्य क्षेत्रासाठी झटत आहेत. आपल्या 'चपराक' मासिकाच्या माध्यमातून त्यांनी अनेक लेखक तयार केले आहेत. तरूणांना त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले आहे. त्यामुळे सागर कळसाईत सारख्या अवघ्या २३ वर्षांच्या लेखकाला त्यांनी 'कॉलेजगेट' या कादंबरीच्या माध्यमातून समोर आणले आहे. आज कॉलेजगेट कादंबरीच्या दोन वर्षात चार आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत. सागर सारखे अनेक लेखक त्यांनी पुढे आणले आहेत. आज 'चपराक प्रकाशन'च्या माध्यमातून घनश्यामजींनी ८० हून अधिक पुस्तके प्रकाशित करून साहित्याची सेवा केली आहे. दिवसरात्र केवळ साहित्याचाच विचार करणारे हे तरूण संपादक, प्रकाशक आता साहित्य परिषदेच्या निवडणुकीस उभे राहिले आहेत. मुळात त्यामागे त्यांचा हाच विचार की, केवळ काठावर राहून आपण पाण्याची खोली मोजू शकत नाही. त्यासाठी पाण्यात उतरणे गरजेचे आहे. त्यामुळे त्यांनी या निवडणुकीत उडी घेतली आहे. साहित्यविषयक आत्मियता असलेल्या मतदारांनी या निमित्ताने साहित्य परिषदेत काही निर्णायक बदल करण्यासाठी घनश्याम पाटील यांच्या पाठिशी उभे राहावे ही विनंती.

**■ सागर सुरवसे**
आयबीएन लोकमत, सोलापूर
९७६९१७९८२३

'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी नेद प्रिंटर्स, ५१८, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३० येथे छापून शॉप नं. १, श्री दुर्वांकुर हौसिंग सोसायटी, १६१, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे प्रसिद्ध केले. **संपादक : घनश्याम वसंतराव पाटील.** (अंकातील मजकुराशी संपादक कदाचित सहमत असतीलही) (वाद-विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत)